दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक ९८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.८ जुलै २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## महाडवर दरडींचा धोका कायम

**दै.रायगड नगरी । महाड**

गेली चार दिवस संपूर्ण तालुक्यात कोसळलत आसलेल्या पावसाच्या आंकाडताडवानी संपूर्ण जनजिवन विस्कळीत होत सर्वत्र भितीच वातावरण पसरल होत मात्र गेल्या तीन दिवसांच्या तुलनेत पावसाच्या धडाडणाऱ्या तोफा थोड्या अंशी शांत झाल्या होत्या तरीही आज महाड जैसे थे असेच होते. प्रतिवर्षी संपूर्ण राज्यात पावसाळ्या मध्ये महाड तालुका कायम नैसर्गिक आपत्तीच्या रडारवर लटकत असतो अतीवृष्ठी मुळे दरडी कोसळून जिवीत हाणी होणे त्या बरोबर सावित्री गांधारी काळ आणि गांधारी नद्याचे पाणी महाड शहरात शिरुन करोडो रुपयांची वित्तहाणी घडणे हे महाडकरांच्या जणू पाचविलाच पुजल आहे असच काहीस वाटत महाड तालुक्यात दिर्घ कोसळणारा पाऊस हा दरडीना निमंत्रन देत असतो. महाडचे कार्यसम्राट आमदार भरतशेठ गोगावले आपल्या मतदार संघात गैरहजर होते मात्र आता गोगावले सक्रीय झाले आहेत त्याच बरोबर एन.डी.आर.एफ. २५ जवानांची टिमही संवेदनशिल महाड मध्ये दाखल झाल्या आहेत.



### दि.११ ऑगस्ट २०२२ ते दि.१७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत

## जिल्ह्यातील सर्व घरे, इमारतींवर दिमाखात फडकणार तिरंगा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

**भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. या गौरवशाली पर्वानिमित्त दि.१२ मार्च २०२१ ते दि.१५ ऑगस्ट २०२३ या कालावधीत आजादी का अमृत महोत्सव या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.**

केंद्र शासनाच्या संस्कृती मंत्रालयाने जनतेच्या मनात भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या स्मृती तेवत राहाव्यात व देशभक्तीची जाज्वल भावना कायमस्वरूपी मनात राहावी व त्याचे संस्मरण व्हावे, या उद्देशाने आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत दि.११ ऑगस्ट २०२२ ते दि.१७ ऑगस्ट २०२२ या कालावधीमध्ये देशभरात हर घर झंडा अर्थात चला फडकवू तिरंगा हा उपक्रम राबविण्याचे निश्चित केले आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांच्या सहकार्याने सर्व शासकीय / निमशासकीय यंत्रणा, खाजगी क्षेत्र, औद्योगिक क्षेत्र, प्रसारमाध्यमांच्या सहकार्याने देशाभिमान व जाणीव-जागृतीची ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.

दि.११ ते दि.१७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत प्रत्येक शासकीय/निमशासकीय व खाजगी आस्थापनांवर तसेच प्रत्येक घर व इमारतींवर राष्ट्रध्वज उभारण्यासाठी नागरिकांनी राष्ट्रध्वज स्वत: विकत घेऊन उत्साहाने या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.कल्याणकर यांनी केले आहे.

नागरिकांना जिल्हा प्रशासनाकडून राष्ट्रध्वज स:शुल्क उपलब्ध करून देण्याबाबतचे नियोजन करण्यात येत असून केंद्रीय गृह विभाग यांच्या अधिसूचनेन्वये हाताने कातलेल्या आणि हाताने विणलेल्या किंवा मशीनद्वारे तयार केलेल्या सूत / पॉलिस्टर / लोकर/ सिल्क/खादीपासून बनविलेल्या कापडाचे राष्ट्रध्वज वापरण्यात यावेत. मात्र यावेळी भारतीय ध्वज संहितेचे पालन व्हावे व जाणते-अजाणतेपणी राष्ट्रध्वजाचा अपमान होऊ नये, याची दक्षता नागरिकांनी घ्यावी, प्रत्येक गावात ध्वज वितरण आणि विक्री केंद्राची निश्चिती करण्यात येणार आहे, स्थानिक लोकप्रतिनिधींना सहभागी करुन घेण्यात येणार असून सर्व शासकीय इमारती / संस्थांवर ध्वजारोहण केले जाणार आहे, असेही जिल्हाधिकारी डॉ.कल्याणकर यांनी कळविले असून हर घर झंडा अर्थात चला फडकवू तिरंगा या उपक्रमात आबालवृद्ध सर्व नागरिकांनी उत्साहाने सहभागी व्हावे, असे आवाहन या निमित्ताने करण्यात येत आहे.

## एलिफंटा बेटावरील ऐतिहासिक तोफा दुर्लक्षित

**दै.रायगड नगरी । उरण**

जागतिक कीर्तीच्या एलिफंटा बेटावरील डोंगर माथ्यावर इतिहासाची साक्ष देणाऱ्या ३० फुटी लांबीच्या दोन्ही तोफांकडे पुरातन विभाग, भारतीय नौदल विभागाकडून अक्षम्य दुर्लक्षच केले जात आहे. वेळीच लक्ष दिले नाही तर ऐतिहासिक ठेवा लवकरच काळाच्या पडद्याआड जाण्याची भिती व्यक्त केली जात आहे.जागतिक कीर्तीच्या एलिफंटा बेटावर ऐतिहासिक लेण्या आहेत.काळ्या पाषाणात शिवाची अनेक रुपे मोठ्या खुबीने करण्यात आली आहेत.

शैवकालीन काळ्या पाषाणात कोरलेल्या या लेण्यांमध्ये योगेश्वर शिव, रावणानुग्रहमूर्ती, शिवपार्वती, अर्धनारीनटेश्वर, गंगावतरण शिव, शिवपार्वती विवाह, अंधकारसुर वधमूर्ती, नटराज शिव आणि महेशमूर्ती अशी शिवाची विविध रूपे या कोरीव शिल्पात अदभुत रितीने कोरलेली आहेत. कोरीव शिल्पांबरोबरच लेणी परिसरातील विविध गाभा-यात अतिप्राचीन शिवलिंग प्रस्थापित करण्यात आली आहेत.त्याच्या सभोवार २० मीटर उंचीचे भव्य व्दारपालांच्या मुर्तीही आहेत.बेट पोर्तुगीजांच्या ताब्यात आल्यानंतर त्यांच्या शिपायांनी लेण्या, शिल्पाची मोठ्या प्रमाणावर तोडफोड केली होती.त्यांच्या तोडफोडीचा खुणा अद्यापही कायम आहेत.

एलिफंटा बेट ताब्यात घेतल्यानंतर बेटाच्या संरक्षणासाठी पोर्तुगीजांनी ३० फुटी लांबीच्या पोलादी



दोन विशालकाय तोफा डोंगर माथ्यावर बसविण्यात आल्या आहेत. मुंबईच्या दिशेने तोंड करून बसविण्यात आलेल्या तोफा शत्रुवर तोफगोळ्यांचा मारा करण्यासाठी या दोन्ही चहुबाजूला फिरविण्याची व्यवस्था होती. या तोफांच्या खाली मोठ्या खोल्या, भुयारे आहेत. तोफगोळे, शस्त्रसाठा, दारुगोळा ठेवण्यासाठी या दोन्ही भुयारांचा वापर केला जात असल्याचे सांगितले जात आहे.

या दोन्ही तोफांपैकी एका तोफेवर इ.स. १९०५ तर दुसऱ्या तोफेच्या मागील बाजूस १९०६ असे कोरण्यात आले आहे. त्यामुळे या दोन्ही तोफा १९ व्या शतकाच्या सुरुवातीस बसविण्यात आल्या असल्याचे इतिहास संशोधकांचे म्हणणे आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही या दोन्ही तोफा सुस्थितीत होत्या. त्यानंतर या दोन्ही तोफा नादुरुस्त झाल्या आहेत. तोफगोळे भरण्याच्या जागा दगडमातीने भरल्या आ-हेत. गोळाकार फिरणाऱ्या तोफांच्या बेअरिंग, पोलादी, पितळी अवशेष केव्हाच गायब झालेले आहेत.

तोफगोळे, शस्त्रसाठा, दारुगोळा ठेवण्यासाठी असलेल्या या दोन्ही भुयारांचा वापर आता भटकी कुत्री, गुरेढोरे करु लागली आहेत. त्यामुळे भुयारे गूरेढोरांचे गोठे झाले आहेत. वटवाघळांच्याही वास्तव्यामुळे भुयारे, खोल्यातुन मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी येत आहे.त्यामुळे पर्यटकांसाठी एलिफंटा बेटावरील डोंगर माथ्यावर

.../२

## उज्ज्वला योजनेतील ३.५ कोटी लोकांनी गेल्या वर्षभरात सिलेंडरच भरला नाही

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात एकीकडे सत्तांतर झाल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील जन-तेला पेट्रोल आणि डिझेलच्या दरात लवकरच सूट देण्यात येईल, असे जाहीर केले. मात्र, दुसरीकडे केंद्र सरकारने घरगुती गॅस सिलेंडरच्या दरात ५० रुपयांची वाढ केली आहे. त्यामुळे, महागाईच्याविरोधात विरोधक रस्त्यावर उतरत असून नागरिकही त्रस्त झाले आहेत. केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री उज्वला योजनेमुळे आर्थिकदृष्ट्या कमकुवत कुटुंबांना विशेष करून महिलांना मोठा दिल-ासा मिळाला. मात्र, या योजनेतही गतवर्षात जवळपास ३.५ कोटींपेक्षा अधिक लोकांनी सिलेंडरच भरला नसल्याची माहिती समोर आली आहे.

उज्वला गॅस योजना ही १ मे २०१६ रोजी उत्तर प्रदेशमधील बलिया येथे सुरू करण्यात आली होती. पीएम उज्वला योजनेच्या माध्यमातून सरकार दारिद्र्य रेषेच्या खालील कुटुंबांना घरगुती गॅस (एलपीजी गॅस) कनेक्शन मोफत देते. प्रधानमंत्री उज्वला योजना (उज्वला योजना ) केंद्र सरकारच्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या सहकार्याने चालवली जात आहे. मोदी सरकारच्यावतीने सातत्याने या योजनेची जाहिरातबाजी करुन सर्वसामान्यांपर्यंत सरकार पोहोचत असल्याचं सांगण्यात आलं. मात्र, कोट्यवधी लाभार्थ्यांनी गॅस सिलेंडरच घेतले नसल्याचे समोर आले आहे.

या उज्वला योजनेंतर्गत एकूण ८ कोटी बीपीएल कुटूंबांना मोफत

.../२

## संक्षिप्त...

### किरीट सोमय्या उद्धव ठाकरेंना माफिया म्हणाले, शिंदे गट चिडला

**दै.रायगड नगरी । मुंबई**

भाजपाचे नेते आणि माजी खासदार किरीट सोमय्या यांनी पूत्र नील सोमय्यांसह आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. यानंतर फोटो पोस्ट करून त्यांनी उद्धव ठाकरेंना माफिया मुख्यमंत्री म्हटले. यावर शिंदे गटाने जोरदार आक्षेप नोंदविला आहे.

मंत्रालयात आज 'रिक्षावाला' मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली, शुभेच्छा दिल्या. माफिया मुख्यमंत्री ना हटविल्या बद्दल अभिनंदन केले, असे ट्विट किरीट सोमय्या यांनी केले. परंतू यावरून आता शिंदे गटात अस्वस्थता पसरली आहे. किरीट सोमय्या यांनी माफिया असा शब्द वापरणे चुकीचे असल्याचे शिंदे गटाचे प्रवक्ते दीपक केसरकर यांनी म्हटले आहे.

यावर स्पष्टीकरण देताना सोमय्या यांनी उद्धव ठाकरेंनी मला, माझ्या कुटुंबाला तुरुंगात टाकण्याची धमकी दिली होती. नवनीत राणांना तुरुंगात टाकले होते. यामुळे मी त्यांना माफियाच म्हणतो, असे ते म्हणाले. तर केसरकर यांनी यावर आक्षेप घेत आमच्यात मतभेद असले तरी उद्धव ठाकरेंवर खालच्या भाषेत टीका करायची नाही असे ठरविलेले आहे. किरीट सोमय्या जे बोलले आहेत ते आक्षेपार्ह आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंशी मी यावर संपर्क करण्याचा प्रयत्न केला, परंतू होऊ शकला नाही. परंतू देवेंद्र फडणवीसांना आक्षेप कळविला आहे. त्यांना किरीट सोमय्यांना आवर घालण्यास सांगितले आहे. आमच्यात जे काही ठरले आहे, त्यानुसार भाजपा नेत्यांनी वा-गावे, असे फडणवीसांना सांगितले असल्याचे केसरकर म्हणाले.

## भर पावसात कंळबुसरे येथील घरावर वन विभागाने फिरवला बुलडोझर

**दै.रायगड नगरी । उरण**

कंळबुसरे गावातील रहिवाशांच्या घरावर भर पावसात उरण वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी कारवाईचा बुलडोझर फिरवला आहे. वन विभागाच्या या कारवाई मुळे कंळबुसरे गावातील रहिवासी भितीच्या सावटा खाली आपल्या कुटुंबासह जीवन जगत आहेत.

उरण तालुक्यातील काही गावे, वस्त्या या खाडी किनाऱ्यावर किंवा डोंगर परिसरात वसल्या आहेत. त्यामुळे गावातील गरीब कुटुंबातील सदस्य, रहिवासी हे आप आपल्या कुटुंबासह वास्तव करण्यासाठी खाडी किनाऱ्यावर किंवा गाव परिसरात गरजे पोटी वाढीव घरे बांधून शासनाचा असणारा दंड भरून वास्तव करत आहेत.

कळंबुसरे गावातील एका रहिवाशांनी गावात कुटुंबाच्या गरजे पोटी वाढीव घराचे बांधकाम केले होते. परंतु राज्याच्या मुख्यमंत्री पदी एकनाथ शिंदे व राज्याच्या उपमुख्यमंत्री पदी देवेंद्र फडणवीस यांची वर्णी लागताच उरण येथील वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी शासनाच्या आदेशाची अंमलबजावणी म्हणून कळंबुसरे गावातील घरावर भर पावसाच्या जुलै महिन्यात बुलडोझर फिरवून सदर कुटुंबाचा संसार उद्धवस्त करण्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी भर पावसाच्या जुलै महिन्यात गरजे पोटी बांधलेल्या घरावर बुलडोझर फिरवल्याने अशा कृत्याचा निषेध कळंबूसरे गावातील रहिवाशांनी व्यक्त केला आहे.



## दिघी पोर्टचे काम जलदगतीने सुरू करणार

### बेंगळूरू-मुंबई कॉरिडॉरसाठी कोरेगाव साताऱ्यातील जमीन उपलब्ध करून देणार : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

बेंगळूरू - मुंबई औद्योगिक कॉरिडॉरचे काम योग्य जागा न मिळाल्याने सुरू झालेले नाही. मात्र आता कोरेगाव सातारा येथील जागा या कॉरिडॉरसाठी देण्यात येणार असून व यासाठी जमीन संपादन प्रक्रिया तत्काळ सुरू करण्यात येईल. त्याचप्रमाणे बल्क ड्रग पार्कची सुरूवात दिघी पोर्टतून सुरू करण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज झालेल्या औद्योगिक कॉरिडॉर प्रकल्पाच्या पेक्स ॲथॉरिटीच्या पहिल्या बैठकीत दिली. मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केलेल्या सूचनेला पीएम गतीशक्ती योजनेअंतर्गत चालना देण्यात येईल आणि दिघी पोर्टबाबत विशेष आढावा ऑक्टोबरपर्यंत घेतला जाईल, अशी ग्वाही केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी आजच्या अध्यक्षीय भाषणात दिली.



या बैठकीत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पीयूष गोयल, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, निती आयोगाचे उपाध्यक्ष सुमन बेरी त्याचप्रमाणे अन्य राज्यांचे मुख्यमंत्री, उद्योग मंत्री, केंद्रीय सचिव आदी दुरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. तर मंत्रालयातून मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, अतिरिक्त मुख्य सचिव बलदेव सिंह, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनबलगन, अतिरिक्त मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, प्रधान सचिव विकास खारगे, औरंगाबाद इंडस्ट्रीयल टाऊनशिप कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक सुरेश काकाणी आदी उपस्थित होते.

सुरुवातीला केंद्रीय वाणिज्य मंत्री श्री. गोयल यांनी मुख्यमंत्री या पदाचा पदभार स्वीकारल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे स्वागत केले. तर भारतास खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर बनविणाऱ्या या अत्यंत महत्त्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांवर चर्चा करण्यासाठी वेळ दिल्याबद्दल मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी आभार मानले.

मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री शिवराज सिंग चौहान यांनी वाराणसी - मुंबई औद्योगिक कॉरिडॉरचे काम होण्याबाबत या बैठकीत सूचना केली. हा प्रकल्प राज्याला हितकारी असल्याने मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी या सूचनेला अनुमोदन दिले. वाराणसी - मुंबई कॉरिडॉर झाल्यास आजूबाजूच्या परिसराचा विकास होईल, असे मुख्यमंत्री म्हणाले.


सध्या राज्यातील टेक्सटाइल पार्क, मेडिकल पार्क आणि बल्क

.../२

## रोहा तालुक्यात धुवाँधार पाऊस ; कुंडलिका नदिने केले रौद्र रूप धारण

**दै.रायगड नगरी । रोहा**

रायगड जिल्ह्यासह कोकणाला पावसाने झोडपल्याने जिल्ह्यातील नद्यांच्या पातळीत लक्षणीय वाढ झाली असून रोह्याची कुंडलिका नदीने गेल्या चार दिवसांत पाचवेळा इशारा पातळी ओलांडली आहे. रोहा तालुक्यात १९७ मी मी पावसाची नोंद झाली आहे. कुंडलिका नदिने रौद्र रूप धारण केले असून जुन्या पुलावरून पाणि वाहू लागले आहे.



रोह्यात गेली चार दिवस धुवाधार पडणाऱ्या पावसाने आज गुरूवारी ही हैदोस घातले आहे. शहरातील मुख्य हमरस्त्यावर ठीक ठिकाणी पाणी साचलेले, पीडबल्यूडी कार्यालयात आणि रोहा अष्टमीतील सखल भागात पाणी शिरले होते. प्रशासनाच्या वतीने नागरिकांना सा-वधानतेचा इशारा देण्यात आला असून भिरा व कोलाड येथिल डोलवहाल धरणातून पाणि सोडण्यात येण्याची शक्यता व्यक्त होत आहे. दुपारी रोहा अष्टमी पुलावरून पाणी वाहू लागले. पाऊसाची स्थिति अशीच राहिल्यास किनाऱ्यावरील गावात पाणि शिरण्याची शक्यता व्यक्त होत आहे. धरणातून पाणी सोडले गेल्यास त्याचा फटका नदीच्या दोन्ही बाजू कडील रोहा अष्टमी शहर आणि लगतच्या गवांना बसणार आहे. तसेच धाटाव एमआयडीसीत कामासाठी मोठया संख्येने येणाऱ्या कामगार वर्गालाही बसणार आहे.

रोहा तालुक्यात मुसळधार पाऊस पडत असुन नदी, नाले तुडूंब भरुन वाहत आहेत. या पावसामुळे जनजीवन पुर्णपणे विस्कळीत झाले आहे. पाण्याची वाढत असलेली पातळी लक्षात घेता तालुका प्रशासनाकडून नदी किनारी असणा-या गावांना सतर्केचा इशारा देण्यात आला आहे. पावसामुळे काही भागातील भातशेती पाण्याखाली गेली असल्याने शेतकरी चिंतित झाला आहे .शेतीच्या बांधाना खांडी गेल्याने पावसाचे पुराचे पाणी शेतात शिरत आहे.

मुसळधार पडत असणा-या या पावसामुळे तालुक्यातील कुंडलिका, गंगा, मैसदरा या नद्या इशारा व धोक्याची पातळी ओलांडून वाहत आहेत. परिणामी नदी किनारील काही गावांचा संपर्क तुटण्याची शक्यता आहे. कुंडलिका तुडूंब भरुन वाहत असल्याने दमखाडी मागिल बाजूस तसेच अष्टमी नाका येथे नदीचे पाणी शिरले आहे.

# स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवांतर्गत हर घर झंडा अर्थात चला फडकवू तिरंगा

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. या गौरवशाली पर्वानिमित्त दि.१२ मार्च २०२१ ते दि.१५ ऑगस्ट २०२३ या कालावधीत आजादी का अमृत महोत्सव या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. तशा सविस्तर सूचना केंद्र शासनाने कळविल्या आहेतच. त्यानुसार राज्यात या कालावधीमध्ये भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्याबाबत विविध शासन निर्णय/शासन पत्रांद्वारे यापूर्वीच वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत.

केंद्र शासनाच्या संस्कृती मंत्रालयाने जनतेच्या मनात भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या स्मृती तेवत राहाव्यात व देशभक्तीची जाज्वल भावना कायमस्वरूपी मनात राहावी व त्याचे संस्मरण व्हावे, या उद्देशाने आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत दि.११ ऑगस्ट २०२२ ते दि.१७ ऑगस्ट २०२२ या कालावधीमध्ये देशभरात हर घर झंडा हा उपक्रम राबविण्याचे निश्चित केले आहे.

या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना वाचकांसाठी एकत्रितरित्या या लेखाच्या माध्यमातून देण्यात येत आहेत. १) सर्व शासकीय / निमशासकीय यंत्रणांनी प्रसारमाध्यमातून देशाभिमान व जाणीव–जागृतीची मोहीम प्रभावीपणे राबवावी. २) दि.११ ते दि.१७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत प्रत्येक शासकीय/निमशासकीय व खाजगी आस्थापनांवर तसेच प्रत्येक घर व इमारतींवर राष्ट्रध्वज उभारण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहित करावे. ३) नागरिकांनी राष्ट्रध्वज स्वत: विकत घेऊन उभारण्यासाठी त्यांना प्रेरित करावे. ४) राष्ट्रध्वज उभारणीसाठी जास्तीत जास्त प्रसिद्धी करावी. यामध्ये प्रामुख्याने सामाजिक माध्यमांचा जास्तीत जास्त वापर करण्यात यावा. ५) केंद्रीय गृह विभाग यांच्या अधिसूचनेन्वये भारतीय ध्वज संहिता २००२ भाग–१ मधील परिच्छेद १.२ मधील राष्ट्रध्वज हे हाताने कातलेल्या किंवा विणलेल्या लोकर/सूत/सिल्क/खादी कापडापासून बनविलेला असेल, या तरतूदीमध्ये बदल करण्यात आला असून या बदलानुसार राष्ट्रध्वज हे हाताने कातलेल्या आणि हाताने विणलेल्या किंवा मशीनद्वारे तयार केलेल्या सूत / पॉलिस्टर / लोकर/ सिल्क/खादी पासून बनविलेल्या कापडाचे असावेत असा उल्लेख केला आहे. या बदललेल्या तरतूदीनुसार तयार करण्यात आलेल्या राष्ट्रध्वजाचा वापर या प्रयोजनासाठी करता येईल. ६) संगीतातूनही राष्ट्रध्वजाबाबत वेगवेगळ्या पद्धतीने सादरीकरण करता येईल. ७) हर घर झंडा या कार्यक्रमाच्या अनुषंगाने नियोजनबद्ध कार्यक्रमाची आखणी करावी. ८) या उपक्रमामध्ये राज्य / देशातील / परदेशातील सहभागी होणाऱ्या व्यक्तींची नोंद घ्यावी. ९) राष्ट्रध्वज मुबलक उपलब्ध होण्याबाबत संबंधित यंत्रणांनी खात्री करावी. १०) ऑनलाईन व ऑफलाईन राष्ट्रध्वज विक्री केंद्र राज्याने उपलब्ध करून द्यावे. ११) भारतीय ध्वज संहितेचे पालन व्हावे व जाणते अजाणतेपणी राष्ट्रध्वजाचा अपमान होऊ नये, याची दक्षता घेण्याबाबत नागरिकांमध्ये जाणीव–जागृती करावी. १२) हर घर झंडा या उपक्रमांतर्गत कार्यक्रमाची छायाचित्रे, चित्रफिती, ध्वनीमुद्रण इ. केंद्र शासनाच्या संस्कृती मंत्रालयाच्या amritmahotsav.nic.in या संकेतस्थळावर अपलोड करावे. १३) नागरिकांमध्ये या उपक्रमाबाबत रुची निर्माण करण्यासाठी वेबसाईट, ई–कॉमर्स तसेच राष्ट्रध्वज भेट देणे अशा माध्यमांचा आधार घेण्यात यावा. १४) स्थानिक स्वराज्य संस्था, पोलीस यंत्रणा, शाळा व महाविद्यालये, परिवहन, आरोग्य केंद्रे, स्वस्त भाव धान्य दुकाने, सहकारी संस्था अशा सर्वसामान्य नागरिकांशी निगडीत यंत्रणांचा वापर करुन हा कार्यक्रम यशस्वी करण्यात यावा.

या उपक्रमाबाबतचा मार्गदर्शक कृती आराखडा पुढीलप्रमाणे:–

(अ) कृती आराखडा: ग्रामपंचायती : सर्व ग्राम पंचायती ग्रामीण प्रसारासाठी महत्वपूर्ण माध्यम. संबंधित विभागाच्या स्तरावर आवश्यक असलेल्या ग्रामपंचायतींच्या प्रमुखांबरोबर संपर्क सत्रे / चर्चासत्रे यांचे आयोजन करावे. प्रत्येक गावात ध्वज वितरण आणि विक्री केंद्राची निश्चिती करावी. बचतगटांचा सहभाग स्थानिक शिलाई काम करणाऱ्या गटांद्वारे ध्वजांची शिलाई/ निर्मिती करता येईल. विक्री / वितरण केंद्र म्हणून ग्रामपंचायत कार्यालयांचा उपयोग करुन घ्यावा. ग्रामपंचायतींद्वारे ध्वजांची मोठ्या प्रमाणावर खरेदी करता येईल. ही खरेदी स्थानिक घरांच्या संख्येवर आधारित असावी. सर्व शासकीय इमारती / संस्थांवर ध्वजारोहण करावे. स्थानिक लोकप्रतिनिधींना सहभागी करुन घ्यावे.

(आ) कृती आराखडा: आरोग्य केंद्रे, रुग्णालये + आशासेविका : या उपक्रमात आरोग्य उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, सामुदायिक आरोग्य केंद्रे, उपविभागीय रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालये यांचा महत्वपूर्ण सहभाग अपेक्षित आहे, संदेश वहन साहित्य – प्रसिध्दी पत्रके, उभे फलक, बॅनर्स इत्यादी स्थानिक भाषेत ठळकपणे प्रदर्शित करावेत. प्रसुतिगृहातील सहाय्यक परिचारिकांना तिरंग्याची माहिती असलेल्या पुस्तिका (फ्लिप बुक्स) यांचे वाटप करावे. लहान मुलांना रंग देण्यासाठी छापील आकृत्या, छापील कागद (कटआउट्स, प्रिंटआउट्स) उपलब्ध करुन द्यावेत. रुग्णालयातील प्रतिक्षा कक्षामध्ये डिजिटल पडदे लावावेत, ध्वज आणि कार्यक्रम संबंधित माहिती प्रदर्शित करावी, तिरंगा ध्वजगीत लावावे, आजादी का अमृत महोत्सव इ. बाबतचे चित्रपट दाखवावेत.

(इ) कृती आराखडा: रास्त भाव धान्य दुकाने (वाजवी किंमतीची दुकाने) रास्त भाव दुकानांनी ध्वज वितरण विक्री केंद्र म्हणून काम पाहावे. या दुकानांमध्ये आणि त्याच्या सभोवताली पूर्व ध्वनीमुद्रित संदेश, सांगितिक जाहिराती (जिंगल), राष्ट्रध्वजावरील माहिती माईकवर प्रसारित करावी.

(ई) कृती आराखडा: शाळा आणि महाविद्यालये : शिक्षक आणि मुख्याध्यापक यांच्यामार्फत जाणीव–जागृती करणे. या योजनेचा प्रचार, प्रसार करण्यासाठी या माध्यमाचा वापर करावा. राष्ट्रध्वजाला समर्पित विशेष संमेलने / शिबीरे / चर्चासत्र इत्यादींचे आयोजन करावे. hargharjhanda या हॅशटॅगखाली समाज माध्यमांवर छायाचित्रे प्रसारित करावीत. राज्य/जिल्हा/ शाळेचा उल्लेख करुन सोशल मीडियावर फोटो शेअर करावेत. पालकांचा सहभाग:– सर्व पालकांना सहभागी होण्यासाठी विशेष दैनंदिन सूचना पत्रे, पत्रके वितरीत करावीत. पालक शिक्षक सभा:– हर घर झंडा विषयी माहिती देण्यासाठी पालक शिक्षक सभांचे आयोजन करावे.

(उ) कृती आराखडा : पोलीस : पोलीस महासंचालकांद्वारे हर घर झंडा या कार्यक्रमाबाबत विशेष बैठकांचे आयोजन करावे. विशेष तिरंगा मानवंदना संचलने आयोजित करावीत. हर घर झंडा या कार्यक्रमाविषयी प्रचार प्रसार व जागरुकतेसाठी प्रचार साहित्य, पत्रिका व इतर साहित्य वितरीत करावे. पथनाट्यांद्वारे तिरंग्याची आण–बाण–शान या संकल्पनेचा प्रसार करण्यात यावा. पोलिस स्टेशन परिसरात फलक, प्रसिध्दीपत्रके, उभे फलक (स्टँडी) लावणे व ध्वजारोहण करणे. पोलिस वसाहतींमध्ये राष्ट्रध्वजाची विक्री व वितरण केंद्रे निर्माण करण्याची विशेष मोहीम घ्यावी. सर्व पोलीस कर्मचाऱ्यांनी त्यांच्या वसाहतीमध्ये / घरी ध्वजारोहण करावे. प्रत्येक पोलीस तपासणी नाक्यावर तिरंगा ध्वजाची प्रसिध्दीपत्रके लावावी.

(ऊ) कृती आराखडा: परिवहन सुविधा : राज्य परिवहनच्या बसेस हर घर झंडा याच्या संदेशाने रंगविल्या जाव्यात. पथकर व तपासणी नाक्यांच्या माध्यमातून हर घर झंडा या कार्यक्रमाचा प्रचार, प्रसार व जागरुकता निर्माण करण्यासाठी माहिती पुस्तिका, प्रसिध्दी पत्रके इ. वितरित करणे. अंतरसंपर्क (इंटरकॉम) आणि ध्वनीचित्रमुद्रण (व्हिडिओ) प्रणालीद्वारे राज्यांतर्गत प्रवासी बसेसमध्ये सांगितिक जाहिराती (जिंगल्स), ध्वनीमुद्रित ध्वजगीत वाजविणे, ध्वज संबंधित चित्रफित दाखविणे.

(ए) कृती आराखडा: प्रसार माध्यमे संकेतस्थळ, भिंतीचित्रे इ. : सर्व राज्य सरकारच्या संकेतस्थळांवर अमृत महोत्सव संकेतस्थळ (amritmahotsav.nic.in) हर घर झंड्याचा दुवा जोडावा. राज्य आणि जिल्हा स्तरावरील कृती आराखड्याबद्दल प्रसार माध्यमांना विशेष माहिती देणे. याअंतर्गत– दि.०१ जूनपासून दररोज विशेष बातमीपत्र सुरु करण्यासाठी दूरदर्शनचा, आकाशवाणीचा वापर करावा. स्थानिक प्रसिध्दी अधिकाऱ्यांनी आयोजित कार्यक्रमांचे योग्य वार्तांकन करावे व त्यावर प्रकाशझोत टाकावा. ध्वज निर्मिती, वितरण, देशभक्ती यांच्याशी संबंधित असलेल्या स्वारस्यपूर्ण कथा निर्माण कराव्यात. सर्व सार्वजनिक बदलीच्या ठिकाणी भिंतीचित्रे (वॉल पेंटिंग्ज) निर्माण करावीत.

(ऐ) कृती आराखडा: महानगरपालिका, नगरपालिका, नगर परिषद, नगर पंचायत : सर्व महानगरपालिका, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत या नागरी भागातील प्रसारासाठी महत्वपूर्ण माध्यम आहेत. महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत यांच्या प्रशासकीय प्रमुखांनी संबंधित वॉर्डच्या अधिकाऱ्यांसमवेत समन्वय करून संपर्क सत्रे / चर्चासत्रांचे आयोजन करावे. प्रत्येक वॉर्डात ध्वज वितरण आणि विक्री केंद्राची निश्चिती करावी. बचत गटांचा सहभाग: स्थानिक शिलाई काम करणाऱ्या गटांद्वारे ध्वजांची शिलाई/ निर्मिती करता येईल. विक्री / वितरण केंद्र म्हणून महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत कार्यालयांचा उपयोग करून घ्यावा. महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत या आस्थापनांना ध्वजांची मोठ्या प्रमाणावर खरेदी करता येईल. ही खरेदी स्थानिक घरांच्या संख्येवर आधारीत असावी. सर्व प्रशासकीय इमारती / संस्थांवर ध्वजारोहण करावे. स्थानिक लोकप्रतिनिधींना सहभागी करुन घ्यावे. संदेश वहन साहित्य – प्रसिध्दी पत्रके, उसे फलक, बॅनर्स इत्यादी स्थानिक भाषेत ठळकपणे प्रदर्शित करावेत. महानगरपालिका / नगरपालिकांच्या रुग्णालयातील प्रतिक्षा कक्षांमध्ये डिजिटल पडदे लावावेत, ध्वज आणि कार्यक्रम संबंधित माहिती प्रदर्शित करावी, तिरंगा ध्वजगीत लावावे, आजादी का अमृत महोत्सव इत्यादी बाबतचे चित्रपट दाखवावेत. राष्ट्रध्वजाला समर्पित विशेष संमेलने / शिबीरे / चर्चासत्र इत्यादींचे आयोजन करावे. महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत वसाहतींमध्ये राष्ट्रध्वजाची विक्री व वितरण केंद्रे निर्माण करण्याची विशेष मोहीम घ्यावी. जाहिरात फलक, बॅनर, फ्लिप बुक्स, सांगितिक जाहिराती (जिंगल्स), ध्वनीमुद्रित इत्यादींचे नमुने.

(ओ) केंद्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालयाकडून खालील स्वरुपाचे सहाय्य उपलब्ध केले जाईल : आजादी का अमृत महोत्सव (रीळींरर्हेीरीं.पळल.ळप) या संकेतस्थळावर हर घर झंडा कॉर्नर अनुवाद करण्यासाठी व प्रसार व प्रचार करण्यासाठी पुरविलेली माहिती व संप्रेक्षण साहित्य डाऊनलोड कराव्यात. जाहिरात फलक, बॅनर, फ्लिप बुक्स, सांगितिक जाहिराती (जिंगल्स), ध्वनीमुद्रित इ. चे नमुने. ध्वजगीत व ध्वनिचित्रफित पुरविणे. अशा प्रकारे हर घर झंडा अर्थात चला फडकवू तिरंगा या उपक्रमात आबालवृद्ध सर्व नागरिकांनी उत्साहाने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील व जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांनी केले आहे.

**मनोज शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**रायगड–अलिबाग**

# भिंगारी गावाला पावसाळ्यातही टँकरचा आधार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील भिंगारी गावाला पावसाळ्यातही टँकरचा आधार घ्यावा लागत असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

महानगरपालिका दोन वर्ष अर्ज करून सुद्धा पाण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे. ग्रामस्थांनी पाठपुरावा करून सुद्धा पाणी येत नसल्याने टँकर द्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो.



यावेळी ग्रामस्थांनी स्थानिक नगरसेवकांवर असंतोष व्यक्त केला. तसेच पाणी प्रश्न सोडविण्यासंदर्भात मा.नगरसेवक सुनील बहिरा यांच्याकडे विनंती केली आहे.

यावेळी शिवसेना उपविभाग प्रमुख अमोल गोवारी, वैभव मढवी अभिजीत लाड, काशिनाथ पाटील, रविंद्र खराडे, पंकज पाटील आणि महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

# पर्यावरणाचे नैसर्गिक संतुलन टिकविण्यासाठी वृक्ष लागवड अत्यावश्यक

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षाचे महत्त्व अधोरेखित आहे हे नव्याने सांगणे नको. सध्याच्या काळात जागतिक पातळीवर हवामानातील बदल आणि वैश्विक उष्णतेत होणारी वाढ या संदर्भात मोठय़ा प्रमाणात विचारमंथन होत आहे. त्यानुसार होणारी तीव्रता व होणारा परिणाम कमी करण्यासाठी तहसील कार्यालय, वनविभाग म्हसळा आणि ग्रामपंचायत देवघर यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीक्षेत्र अमृतेश्वर मंदिर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

याप्रसंगी प्रांताधिकारी अमित शेडगे, तहसीलदार समीर घारे, वनक्षेत्रापाल संजय पांढरकमे, मंडळ अधिकारी खामगांव सलीम शहा, म्हसळा मंडळ अधिकारी उभारे, नायब तहसीलदार पाटील, निवासी नायब तह–सीलदार जे. एम. तेलंगे , सचिन महामूनकर, अनिल महामूनकर, तलाठी विनय शेळके, तलाठी श्रीम. कारंडे, तलाठी के. पी. पाटील, कृषी विस्तार अधिकारी बाक्कर, वनपाल अतुल अहिरे,महसूल कर्मचारी, वनविभागाचे कर्मचारी आदि मान्यवर उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या आव्हानानुसार आणि वृक्ष लागवड शासनाच्या परिपत्रकाच्या पार्श्वभूमीवर म्हसळा तालुक्यात वन विभाग आणि सामाजिक वनीकरण विभागा मार्फत १लक्ष २४ हजार४४ वृक्ष लागवड करणार असल्याचे परिक्षेत्र वन अधिकारी संजय पांढरकामे यानी आमचे प्रतिनिधीला सांगितले, यामध्ये शिवण, खैर, हिरडा, बांबू, आवळा, शिसू, काजू, चिंच, सिताफळ, टिटव या प्रजातीची देशी वृक्षरोपे स्थानिक नर्सरीत तयार केलेली लावण्यात येणार आहेत, वन विभागा मार्फत १ लक्ष ९ हजार ९८९, तर सामाजिक वनीकरण मार्फत १४ हजार ५५ उत्कृष्ट / सशक्त रोपे लावण्यात येणार आहेत. वन विभागा मार्फत कुडतोडी, कांदळवाडा, देहेन, सरवर, पाष्टी, वरवठणे, येथील वनक्षेत्रांत, सामाजिक वनीकरण मार्फत रस्ता दुर्तफा वृक्ष लागवड या योजनेंतून सकलप ते वडवली या ९ कि.मी., म्हसळा ते घोणसे, पाष्टी ते वांगणी, म्हसळा –श्रीवर्धन बाह्य वळण रस्ता, या रस्त्यावर दुर्तफा वृक्ष लागवड करण्यात येणार आसल्याचे लागवड आधिकारी पाटील यानी सांगितले, ७ जुलै ते १५ जुलै या कालावधीत तालुक्यांतील सर्व विभागाचा एकत्रित सहभाग घेऊन वृक्ष लागवड करण्यात येणार आसल्याचे समजते.

मागील काही वर्षांत म्हसळयांतील लोक प्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था,आणि जनतेने वृक्ष लागवड ही लोकचळवळ म्हणून सिद्ध केली. गेल्या तीन चार वर्षात याचा सकारात्मक परिणाम दिसला आहे,पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षाचे महत्त्व जनतेला अध–रेखित झाले आहे. परंतु नव्याने शासनाला जनतेचा सहभाग नको असतो याची खंत व्यक्त होते . देवघर येथील वृक्ष लागवड कार्यक्रम प्रसंगी प्रांतधिकारी यांनी वृक्ष लागवडीचे महत्व सांगून पर्यावरणाचे नैसर्गिक संतुलन टिकविण्यासाठी वृक्ष लागवड करून त्यांचे संवर्धन करणे अत्यावश्यक असल्याचे सांगितले.

# सामाजिक वनीकरण विभागामार्फत वांगणी हायस्कूलमध्ये वनमहोत्सव साजरा

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या नागोठण्याजवळील बाळसई येथील माध्यमिक विद्यालय वांगणी या शाळेत सामाजिक वनीकरण विभाग रोहा यांच्या सहकार्याने बुधवार दिनांक ६ जुलै २०२२ रोजी वनमहोत्सव व वृक्षारोपण कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

यावेळी सामाजिक वनीकरण विभाग रोहा येथील वनक्षेत्रपाल आशिष पाटील, वनपाल दिलीप वाघे, वनपाल शंकर कराडे, वनरक्षक धिरेश थळकर, शाळेचे मुख्याध्यापक जयहिंद ठाकूर, हरितसेना प्रमुख टिळक खाडे, शाळेतील शिक्षक अरविंद शेळके, नरेंद्र पाटील, विकास म्हात्रे, वन कर्मचारी सुरेश वाघमारे, सुनिल लांगी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी शाळेच्या परिसरात करंज, चिंच, कदंब, फणस, पिंपळ, जांभूळ, फणस आदी स्थानिक प्रजातींची पन्नास वृक्षांची रोपटी लावण्यात आली.

या निमित्ताने शाळेतील विद्यार्थ्यांनी पर्यावरणाचे ठेवा भान, तरच बनेल देश महान, झाडे लावा, चैतन्य फुलवा अशा आशयाचे फलक हातात घेऊन वृक्षसंवर्धनाचा व पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला. शाळेतील विद्यार्थीनींनी पारंपरिक वेशभूषा करुन कार्यक्रमाची रंगत वाढवली. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वनक्षेत्रपाल आशिष पाटील यांनी त्यांच्या प्रत्येक वाढदिवसाला एक झाड लावण्याचे व त्याचे जतन करण्याचे आवाहन केले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## एलिफंटा बेटावरील ऐतिहासिक तोफा दुर्लक्षित

निसर्गाच्या कुशीत असलेला आकर्षणाचा कॅनन हिल पाँइंट सध्या अक्षम्य दुर्लक्षामुळे अडगळीत पडलेला दिसुन येत आहे.

एलिफंटा बेटावरील या दोन्ही ऐतिहासिक तोफांचा ताबा सुरुवातीपासूनच पुरातन विभागाकडे देण्यात आलेला नाही. त्यामुळे देखभालीकडे दुर्लक्ष होत आहे. ग्रामपंचायत, पर्यटन विभागाने मागणी केल्यास ताबा पुरातत्त्व विभागाला मिळू शकेल अशी माहिती पुरातन विभागाचे व एलिफंटा लेण्यांचे केअरटेकर कैलास शिंदे यांनी दिली आहे.

देशभरातील ४० हेरिटेज पैकी एलिफंटा लेणी एक आहे.या कॅनन हिल पाँइंट, ऐतिहासिक तोफा जतन करण्याची आवश्यकता आहे.पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी ग्रामपंचायतीने भुयारे, रस्त्यावर असलेली व्हेंटिलेटर आणि तोफा सभोवताली लोखंडी ग्रील्स लावण्यात आल्या आहेत.पुरेसा निधी उपलब्ध झाल्यास डोंगर माथ्यावरील कॅनन हिल पाँइंटचे सुशोभीकरण, विकसित करण्याची योजना असल्याची माहिती घारापुरी सरपंच बळीराम ठाकुर यांनी दिली आहे.

## उज्ज्वला योजनेतील ३.५ कोटी लोकांनी गेल्या वर्षभरात सिलेंडरच भरला नाही

एलपीजी कनेक्शन उपलब्ध करण्याचे उदिष्ट आहे. त्यापैकी ६ कोटीपेक्षा अधिक नागरिकांना या योजनेच्या माध्यमातून कनेक्शन देण्यात आले आहे. मात्र, गतवर्षात या योजनेच्या माध्यमातून सिलेंडर भरणारांची संख्या कमी झाल्याचे दिसून येते. कारण, माहिती अधिकारात मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या वर्षभरात उज्वला गॅस योजनेंतर्गत असलेल्या गॅस कनेक्शनधारकांपैकी ३ कोटी ५९ लाख कुटुंबांपैकी एकानेही सिलेंडर भरून नेले नाही. यासंदर्भात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी माहिती दिली आहे. त्यांनी, आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवरुन यासंदर्भात पोस्ट केली आहे.

## दिघी पोर्टचे काम जलदगतीने सुरू करणार

ड्रा पार्क हे प्रकल्प प्रस्तावित असून केंद्र शासनाने लवकरात लवकर मान्यता दिल्यास या ही कामे जलद गतीने सुरु होऊन राज्याला आणि पर्यायाने केंद्रालाही मोठा फायदा होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

औरंगाबाद येथील शेंद्रा बिडकीन येथील ऑरिक सिटीला उद्योजक आणि गुंतवणूकदारांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे. या ठिकाणी ५५४२ कोटींची गुंतवणूक आली असून ३७५ एकर भूखंड उद्योगांना देण्यात आले आहेत. याठिकाणी ३ लाख लोकांना रोजगार निर्मिती होणार आहे. पंतप्रधानांनी देखील या प्रकल्पाचे कौतुक केले असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी नमूद केले.


दिघी – माणगाव औद्योगिक क्षेत्र देखील विकसित करण्यात येत असून महाराष्ट्र औद्योगिक विकास प्राधिकरणाकडून त्वरित मदत झाल्यास विकासाला चालना मिळेल. याठिकाणी ८५ टक्के जमीन संपादन पूर्ण झाले आहे. कराराची तांत्रिक प्रक्रिया केंद्राकडून लवकर पूर्ण झाली तर तीन महिन्यात उर्वरित भूसंपादन पूर्ण करता येईल, असे सांगून बिडकिन ते पैठण मार्गाचे काम राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून गतीने व्हावे, अशी सूचना मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी केली.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी या विविध प्रकल्पांना पीएम गतीशक्ती या योजनेत समावेश करून निती आयोगास तत्काळ आढावा घेण्याबाबतच्या सूचना केल्या. राज्यातील प्रकल्पांबाबतही उद्योग सचिव आणि बंदरे सचिव यांनी यासंदर्भात लक्ष द्यावे, असेही त्यांनी सांगितले.

# मराठा भवन उभारण्यासाठी भूखंड उपलब्ध करून देण्याची गणेश कडू यांनी मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेचे महाविकास आघाडीचे नगरसेवक गणेश कडू यांनी मराठा भवन उभारण्यासाठी भूखंड उपलब्ध करून द्यावा अशी मागणी आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे केली आहे.



पनवेल महानगर पालिकेच्या झालेल्या सर्वसाधारण सभेत नगरसेवक गणेश कडू यांनी मराठा समाजाचे भवन उभारण्यासाठी शहराच्या प्रवेश द्वार परिसरात भूखंड उपलब्ध करून द्यावा अशी मागणी केली आहे. पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणात मराठा समाज वास्तव्यात असून त्यांच्या समाजाच्या विविध कार्यक्रम व उपक्रमासाठी एक भवन उभारणे गरजेचे आहे. यासाठी पनवेल महानगरपालिकेने लक्ष घालून पनवेल महापालिकेच्या प्रवेशद्वार परिसरात भूखंड उपलब्ध करून द्यावा अशी मागणी त्यांनी केली आहे.


**कागदपत्रे हरविलेबाबत**
**जाहीर नोटीस**

कळंबोली परिसरात साईबाबा अपार्टमेंट ओनर्स असो., बि.नं.२७, रुम नं.१६, सेक्टर–०२, कळंबोली या सोसायटीचे मुळ मालक श्रीमती.सुनिता मधुकर साळवी यांचे कागदपत्र Deed of Apartment Between Cidco Kundalik Baburao Gaikwad on Dated 13/04/1993 कुठेतरी पडून गहाळ झाले आहेत. त्याबाबत कळंबोली पोलीस स्टेशनमध्ये एफ.आय.आर. नोंदविली आहे. तरी ॲड.धर्मनाथ एन. गोंधळी जाहिरात देत आहेत.

ठिकाण : कळंबोली
दिनांक : ०७/०७/२०२२

**सही/–**
**ॲड.धर्मनाथ एन. गोंधळी**
**वकील**



**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : तळोजे मजकूर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील श्री.जगन्नाथ शंकर पाटील यांचे सामाईक मालकीची व ताबेकब्जातील खालील वर्णनाची जमीन मिळकत आमचे अशिलांनी कायम स्वरुपात विकत घेण्याच्या विचार केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : तळोजे मजकूर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| १७ | ३ | ०–३०–५० पैकी ०–१०–१६ | ४.८६ |

सबब वर नमूद शेतजमीन मिळकतीवर किंवा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षिस, चार्ज, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत हक्क हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

दि.०७/०७/२०२२

**सही/–**
**ॲड.प्रवीण दत्तू पाटील**
**हरिओम नगर, फ्लॅट नंबर बी–२,**
**तळमजला, कफ नगर ठाणा नाका, जुने पनवेल, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**
**मो.नं.९९२०९९५९९६**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## ४ लाख १० हजार रुपये गमावले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर भागात राहणाऱ्या एका व्यक्तीने अर्धा किलो काजू वर अर्धा किलो बदाम मोफत मिळविण्याच्या नादात ४ लाख १० हजार रुपये गमावल्याचा प्रकार घडला आहे. सदर प्रकरणात फसवणूक झालेल्या व्यक्तीला अज्ञात सायबर चोरट्याने अर्धा किलो काजू वर अर्धा किलो बदाम मोफत देण्याचा बहाणा करुन तक्रारदाराकडून क्रेडीट कार्डची माहिती घेऊन त्याच्या खात्यातून ४ लाख १० हजार रुपये परस्पर काढून घेतले आहेत. त्यामुळे खारघर पोलिसांनी अज्ञात सायबर चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

सदर प्रकरणात फसवणूक झालेले शरद बिबवे (४९) खारघर, सेक्टर- ३६ मध्ये राहण्यास असून ते मिनी बस चालवतात. सायबरचोरट्यांनी फसवणूक करण्यासाठी फेसबुकवर टाकलेली अर्धा किलो काजू वर अर्धा किलो बदाम मोफत देण्याची डी-मार्टची जाहिरात त्यांच्या निदर्शनास आली. अर्धा किलो काजू वर अर्धा किलो बदाम मोफत मिळणार असल्याने शरद बिबवे यांनी सदर जाहिरातीवरुन अर्धा किलो काजुची ऑर्डर बुक केली. तसेच त्यावर आपल्या क्रेडीट कार्डचा क्रमांक आणि सीव्हीव्ही नंबर टाकला. त्यानंतर सदरची जाहिरात बनावट असल्याचे त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यातून बिबवे बाहेर पडले.त्यानंतर दुसऱ्या दिवशी सायबर चोरट्याने डी-मार्टचा प्रतिनिधी असल्याचे भासवून बिबवे यांना संपर्क साधला. तसेच त्यांनी आदल्या दिवशी ऑनलाईन मागवलेले काजू आणि बदाम त्यांना घरपोच मिळतील असे सांगून त्यांच्या व्हॉटस्‌ॲपवर एक लिंक पाठवून दिली. तसेच सदरचे ॲप डाऊनलोड करुन पुढील खरेदीसाठी देखील त्याचा वापर करता येईल, असे सांगितले. त्यामुळे बिबवे यांनी सदरची लिंक उघडून त्यात आपली सर्व माहिती भरल्यानंतर त्यांच्या क्रेडीट कार्डवरुन १० हजार रुपये गेल्याचे त्यांना समजले. त्यामुळे बिबवे यांनी तत्काळ बँकेच्या हेल्पलाईनला संपर्क साधून सदर क्रेडीट कार्ड बंद करुन घेतले. मात्र, तोपर्यंत सायबर चोरट्याने त्यांच्या बँक खात्यातील एकूण ४ लाख १० हजार रुपये काढून घेतले. त्यानंतर बिबवे यांनी खारघर पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात सायबर चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

# श्रीवर्धनमध्ये पशू वैद्यकीय फिरता दवाखाना बंद

## दवाखाना बैठा ना फिरता, डॉक्टरविना पशुसंवर्धन सेवेचा उडतोय बोजवारा

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यासाठी गतवर्षी फिरता पशू वैद्यकीय दवाखाना सुरु करण्यात आला. या फिरत्या दवाखान्यामुळे असंख्य शेतकऱ्यांच्या दारात आजारी पशू रुग्णांवर उपचाराची सुविधा मिळाली. मात्र, सद्या डॉक्टरविना फिरता दवाखाना बंद आहे. शिवाय बोर्लीपंचतन परिसरात मागील तीन वर्षांपासून पशुवैद्यकीय चिकित्सालयात एकही पशुधन विकास अधिकारी नसल्याने पशुधन च आता धोक्यात आले आहे.

महाराष्ट्र शासन व पशूसंवर्धन विभागाच्या उपक्रमांतर्गत मुख्यमंत्री पशूसंवर्धन योजनेतून श्रीवर्धन तालुक्यासाठी फिरता पशू वैद्यकीय दव-खाना फेब्रुवारी २०२१ रोजी सुरु करण्यात आला. फिरत्या दवाखान्याच्या रुग्णवाहिकेची व त्यातील औषधांमुळे खेड्या - पाड्यातील जनावरांना त्वरित उपचार मिळेल या आशेने येथील शेतकऱ्यांना



मोठा दिलासा मिळाला. मात्र, आज पावसाळी हंगामात श्रीवर्धन तालुक्यात मोठ्या संख्येने जना-वरे असताना देखील त्यांच्यावर उपचाराची मात्र प्रभावी यंत्रणा नाही. डॉक्टरभावी बंद रुग्णवाहिका शिवाय याठिकाणी असलेले लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालयात दोन वर्षांपासून महत्त्वाच्या अधिकाऱ्यांची पदे रिक्त असून याचा थेट परिणाम जनावरांच्या उपचारावर होत आहे.

श्रीवर्धन, बागमांडला, दांझुरी, बोर्लीपंचतन, दिघी, सायगाव या ठिकाणी पशुवैद्यकीय चिकित्सालयाच्या विशाल इमारती शासनाने लाखो रुपये खर्चून बांधल्या आहेत. येथे श्रेणीनुसार पशुसंवर्धन सेवा पुरवली जाते. मात्र, यातील श्रीवर्धन वगळता अन्य चिकित्सालयात पर्यवेक्षक व अधिकारी नसल्याने सध्या त्या निरूपयोगी ठरत आहे. घटसर्प, एकटांग्या रोग तसेच लाळ खुरकत, कृत्रिम रेतन, विविध आजार हटविण्यासाठी लसीकरण अशा राबविण्यात येणाऱ्या मोहिमेकडे दुर्लक्ष झाले आहे. आता उरल्या - सुरल्या फिरत्या दवाखान्याची वाट बघत असताना तेही बंद असल्याने शेतकरी वर्गातून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

श्रीवर्धन तालुक्यात शेतीला जोडधंदा म्हणून बहुतांश शेतकऱ्यांकडे दुधाळ जनावरे व शेती हिताच्या दृष्टिकोनातून इतर पशु आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील पशुवैद्यकीय केंद्रांमध्ये जनावरांवर तात्काळ उपचार मिळावा. परंतु शस्त्रक्रियासारख्या बाबींसाठी शेतकरी आपली जनावरे तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या पशुचिकित्सालयात आणतात. या चिकित्सालयाशिवाय शेतकऱ्यांपुढे दुसरा पर्याय नाही. परंतु या ठिकाणी अपेक्षित असा उपचार पशुंना मिळत नाही. विविध रिक्त पदे, औषधींचा तुटवडा अशा बाबी याठिकाणी नित्याच्याच झाल्या आहेत. वरिष्ठ अधिकारी व लोकप्रतिनिधींचा लक्ष नसल्यामुळे याठिकाणी मोठ्या प्रमाणात सावळा गोंधळ दिसून येतो. श्रीवर्धन तालुक्यात सहा दवाखाने असून या पैकी पाच पशुवैद्यकीय चिकित्सालयात पशुधन विकास अधिकारी नाही. रानवली अधिकारी यांच्याकडे श्रीवर्धन, बागमांडला व पंचायत समिती विस्तार या अधिकाऱ्यांचा अतिरिक्त कार्यभार आहे. तर बोर्लीपंचतन विभागात एकही अधिकारी नाही. अत्यंत बिकट परिस्थितीत जनावरांच्या उपचारासाठी आवश्यक असणारा फिरता दवाखाना बंद आहे.

# एक लाख वीस हजार रुपयांची वीज चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अनधिकृत पणे वीज जोडणी घेऊन महावितरणच्या विजेची चोरी केल्याप्रकरणी कोपरा येथील प्रकाश बामा पाटील यांच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

महावितरणचे अधिकारी कोपरा गाव येथे विद्युत तपासणी करत असताना प्रकाश बामा पाटील यांच्या घरी मीटरमध्ये विनापरवानगी अनधिकृतरित्या लूप टाकून डायरेक्ट केबल टाकून वीज चोरी करत असल्याचे आढळून आले.

हा अनधिकृत वीजपुरवठा गेल्या बारा महिन्यांपासून सुरू असून महावितरणचे १ लाख २० हजार ५२० रुपयांच्या आर्थिक नुकसान झालेले आहे. यावेळी लुप केबल महावितरणने ताब्यामध्ये घेतली. वीज चोरी केल्यामुळे प्रकाश बामा पाटील यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# कर्जत नगर परिषद मध्ये दोन सफाई कामगारांच्या मुलांची वारसा पद्धतीने नियुक्ती



**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत नगरपरिषद मधील आरोग्य विभागात सफाई कामगार म्हणून कार्यरत असलेल्या दोन सफाई कामगार निवृत्त झाले त्यांच्या मुलांना वारसा पध्दतीने नगरपरिषद मध्ये सेवेत नियुक्त करण्यात आले, तसे नियुक्तीपत्र त्यांना देण्यात आले.

कर्जत नगरपरिषदेच्या आस्थापनेवर अशोक गणेश रणदिवे व सुभाष धाऊ सोनावणे हे आरोग्य विभागात सफाई कामगार म्हणून काम करत होते त्यांच्या सेवा निवृत्तीनंतर अशोक रणदिवे यांचा मुलगा विश्वदीप रणदिवे तर सुभाष सोनावणे यांचा मुलगा प्रज्वल सोनावणे यांना लाड पागे कमिटीच्या शिफारशीनुसार वारसा पद्धतीने आरोग्य विभागात सफाई कामगार म्हणून नियुक्ती करण्यात आले आहे, हे नियुक्ती पत्र नगराध्यक्षा सुवर्णा जोशी व मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांच्या हस्ते देण्यात आले.

याप्रसंगी उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, नगरसेवक बळवंत घुमरे, कार्यालयीन अधीक्षक जितेंद्र गोसावी, आस्थापना विभाग प्रमुख अविनाश पवार, अभियंता मनिष गायकवाड,आरोग्य विभागाचे सुदाम म्हसे यावेळी उपस्थित होते.

# पेठाली येथील शाळेतून एलसीडी मॉनिटरची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अज्ञात चोरट्याने तळोजा पाचनंद येथील रायगड जिल्हा परिषदेच्या पेठाली येथील प्राथमिक शाळेतील वर्ग खोल्यांचा कडी-कोयंडा तोडून ४२ इंची एलसीडी टीव्ही व डेल कंपनीचा मॉनिटर चोरून नेला. तळोजा पोलिसांनी या प्रकरणी घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

पेठाली गावात जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा असून या शाळेतील पहिली व दुसरीच्या वर्गामध्ये ४२ इंची एलसीडी टीव्ही व मॉनिटर लावण्यात आले होते. सकाळी शाळेच्या शिक्षिका कुडये शाळेत गेल्या असता, शाळेतील व्हरांड्याचे ग्रिल खुले असल्याचे व वर्ग खोल्यांचा कडी-कोयंडा तुटल्याचे निदर्शनास आले. आतमध्ये पाहणी केली असता, एलसीडी टीव्ही व मॉनिटर चोरीला गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी तळोजा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. याप्रकरणी अधिक तपास सुरू असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

# चांदेपट्टी दरडग्रस्तांना भाजप तर्फे ब्लँकेट वाटप

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील अतिशय दुर्गम तसेच डोंगर दरीच्या कुशीत वसलेल्या चांदेपट्टी गावाला दरड व भूस्खलनाची भीती असल्याने येथील नागरिकांना पेण तालुका मराठा समाज सभागृहात स्थलांतरित करण्यात आले आहे. या स्थलांतरित करण्यात आलेल्या चांदेपट्टी वासीयांना भाजपचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांच्या पुढाकाराने पेण तालुका भारतीय जनता पार्टी तसेच नागोठणे शहर भाजप तर्फे मदतीचा हात देण्यात आला. या नागरिकांना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.

यावेळी भाजप रायगड जिल्हा महिला उपाध्यक्षा श्रेया कुंटे, नागोठणे भाजप शहर अध्यक्ष सचिन मोदी, भाजपा नागोठणे उपाध्यक्ष गौतम जैन, रोहा तालुका महिला मोर्चा उपाध्यक्ष नीलिमा राजे, नागोठणे विभाग महिला मोर्चा सरचिटणीस मुगदा गडकरी आदी उपस्थित होते. यावेळी चांदेपट्टी ग्रामस्थांची पेण प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार, पेण तहसीलदार स्वप्नाली डोईफोडे यांनी देखील भेट घेऊन पुरविण्यात आलेल्या सुविधांचा आढावा घेतला.




गोडसे साहेब कोर्ट

**ॲड.रेखा होवाळे**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्याया. व.स्तर यांचे समोर
वारसाचे सर्टीफिकेट मिळणेबाबत अर्ज

अर्ज नंबर ९२४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२३/०८/२०२२

१) श्री.राजेंद्रन रामनाथन
वय : ६५, धंदा : निवृत्त
रा.सदनिका क्र.१०१, पहिला मजला, सानपाडा
अभिषेक सोसायटी, प्लॉट नं.२४, वाशी
२) वृशोध राजेंद्रन अय्यर
वय : ३२, धंदा : नोकरी
३) निशा राजेंद्रन अय्यर
वय : ३२, धंदा : नोकरी
दोघेही रा.१०६, गोल्फ एज रेसिडेंस,
नानक्रमगुडा गचीबोली, हैद्राबाद अर्जदार

ज्यापेक्षा कै.श्रीमती.सरस्वती राजेंद्रन ह्यांचा मृत्यू दि.०७/०७/२०२१ रोजी बेंगलुरु येथे झाला. अर्जदार नं.१ हे कै.श्रीमती.सरस्वती राजेंद्रन यांचे पती आहेत व अर्जदार नं.२, ३ ही मुले आहेत. आणि त्यांनी वारस या नात्याने खालील मिळकतीबद्दल वारस दाखला मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

Name of the Property Holder :
SMT SARSWATHI RAJENDRAN

1) Sanpada Abhishek Co.op.Hsg Society Ltd., Flat No.101, First Floor, Plot No.24, Sector-30, Vashi, Navi Mumbai-400703, Area :- 625 Sq.Ft Agreement value :- 6,00,000/- (Six lakhs only)

2) Flat No.303, Third Floor, Hari Darshan co.op. Hsg Society Ltd, Plot No.17 & 18, Sector-09, Ulwe, Navi Mumbai, Area : 65.540 Sq. Mtrs., Agreement value :- 60,00,000/- (Sixty lakhs only)

3) Flat No.101, 1st Floor, Vankvani's Ela, Plot No.52 & 52 A, Sector-18, Ulwe, Navi Mumbai, Tal-Panvel, Dist-Raigad, Area :- 30.13 Sq. Mtrs. Agreement value 27,44,000/- (Twenty seven lakhs forty four thousand only)

यासाठी वारसदाखला मिळावे असा अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजविण्याचे असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत कोर्टात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्या आणि या लेखी नोटीसवरुन असे कळविण्यात येते की, तसेच योग्य मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट या अर्जदारास ह्याचे बद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित झाल्यास त्याला सदरहू मयत यांचा वारस घोषित करेल.

तारीख ६ माहे ७ सन २०२२. बेलिफाकडे

**सही/-** **सही/-**
**क.लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल** **दि.न्या.क.स्तर, पनवेल**



श्री.मुजावर सो.कोर्ट

**ॲड.अरविंद चामले**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो.पनवेल यांचे न्यायालयात

चौ.अर्ज क्र.१०११/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१२/०९/२०२२

कै.मेहमुदशाह युसुफशाह पटेल (मयत) तर्फे वारस
१) शहनाज मेहमुदशाह पटेल
वय : ५७ वर्षे, धंदा : गृहिणी
२) अदनान मेहमुदशाह पटेल
वय : ३२ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.फ्लॅट नं.४०४, ४ था मजला, ए विंग,
प्रगती पार्क, प्लॉट नं.१३, सेक्टर ५,
उलवे नोड ४१०२०६ अर्जदार

सदर जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, प्रस्तुत अर्जदार यांनी मे.कोर्टात चौकशी अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ यांचे वडील कै.मेहमुदशाह युसुफशाह पटेल हे दि.२६/०६/२०२१ रोजी उलवानोड, नवी मुंबई येथे मृत्यू पावले असून येथील कायमचे रहिवाशी होते. मृत्यूसमयी त्यांचे नावावर स्वकष्टार्जित खालीलप्रमाणे मिळकत होती व तिचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : उलवे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**
**फ्लॅट नं.४०४, ४ था मजला, ए विंग, प्रगतीपार्क, प्लॉट नं.१३, सेक्टर ५, उलवे नोड, नवी मुंबई क्षेत्र ४७.९९२ चौ.मी. बांधीव टेरेस सह.**

मयत कै.मेहमुदशाह युसुफशाह पटेल यांचे कायदेशीर वारसदार पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्रं. | वारसदाराचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १ | शहनाज मेहमुदशाह पटेल | ५७ | पत्नी |
| २ | अदनान मेहमुदशाह पटेल | ३२ | मुलगा |

वरील प्रमाणे मयत कै.मेहमुदशाह युसुफशाह पटेल यांचे कायदेशीर वारसदार आहेत व यांचे शिवाय इतर कोणीही वारसदार नाहीत व नव्हते. प्रस्तुतचा चौकशी अर्ज हेअरशिप ठरवून मिळण्यासाठी मे.कोर्टात दाखल केला आहे. तरी या संदर्भात वारसा संबंधी कोणत्याही प्रकारची तक्रार हरकत वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.५/०७/२०२२
ठिकाण : पनवेल

**सही/-** **सही/-**
**क.लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **सहा.अधिक्षक**
**दि.न्याया, पनवेल** **दि.न्या.क.स्तर, पनवेल**



**जाहीर नोटीस**

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१०८/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१८/०८/२०२२

१) श्री.रमाकांत गोपीनाथ म्हात्रे
२) श्री.धर्मा गोपीनाथ म्हात्रे
३) श्री.गुरुनाथ गोपीनाथ म्हात्रे
४) कै.गजानन गोपीनाथ म्हात्रे
४/१) श्रीमती.नलिनी गजानन म्हात्रे
वरील क्रं.१ ते ४/१
रा.घर नं.४३२, मु.रांजणपाडा,
पो.जासई, ता.उरण, जि.रायगड
५) श्रीमती.नर्मदाबाई कमलाकर मढवी
पुर्वाश्रमीचे नाव
श्रीमती.नर्मदाबाई गोपीनाथ म्हात्रे
६) श्रीमती.मंजुळा बाळाराम जोशी
पुर्वाश्रमीचे नाव
श्रीमती.मंजुळा गोपीनाथ म्हात्रे
वरील क्रं.५ ते ६
रा.मु.पापडीचापाडा, तळोजा मजकूर,
तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार क्रं.१, २, ३, ५ ते ६ यांची आई व अर्जदार क्रं.४/१ यांची सासू कै.बबुबाई उर्फ बबीबाई गोपीनाथ म्हात्रे ह्या दि.०५/०१/२०२० रोजी मु.रांजणपाडा, पो.जासई, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. कै.बबुबाई उर्फ बबीबाई गोपीनाथ म्हात्रे हे मयत झाले आहेत. ते हयात असताना त्यांच्या मृत्यूसमयी त्यांच्या नावे खालील वर्णनाची मिळकत होती व आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : जासई, ता.उरण, जि.रायगड**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| जासई १९/८८ | १५८ | ५ | ००-०७-७० |
| जासई २२९ | २७ | ४ | ००-२७-८० |

येणेप्रमाणे जमिन मिळकतीचे वर्णन असून सदरहू जमीन मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केल आहे.

येणेप्रमाणे वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदार हे तसेच कै.बबुबाई उर्फ बबीबाई गोपीनाथ म्हात्रे यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह ना.कोर्टात दाखल करावी. वरील मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन ना.कोर्ट अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२९ जून २०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **सही/-**
**क.लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, उरण** **दि.न्या.क.स्तर, उरण**



**जाहीर नोटीस**

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१०२/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०८/०९/२०२२

१) श्री.महादेव शांताराम म्हात्रे
वय : ६८ वर्षे, व्यव : निवृत्त
२) श्री.आकाश शांताराम म्हात्रे
वय : ६२ वर्षे, व्यव : धंदा
३) कै.गणेश शांताराम म्हात्रे
३/१) श्रीमती.तारा गणेश म्हात्रे
वय : ६३ वर्षे, व्यव : गृहिणी
३/२) श्री.करण गणेश म्हात्रे
वय : ३६ वर्षे, व्यव : नोकरी
४) श्री.शिरिष शांताराम म्हात्रे
वय : ५१ वर्षे, व्यव : धंदा
५/१) श्रीमती.सुगंधा गिरीश म्हात्रे
वय : ३७ वर्षे, व्यव : गृहिणी
५/२) कु.जान्हवी गिरीश म्हात्रे
वय : १२ वर्षे, व्यव : शिक्षण
तर्फे अज्ञान पालनकर्ती आई
श्रीमती.सुगंधा गिरीश म्हात्रे
६) श्रीमती.प्रमिला अविनाश म्हात्रे
पुर्वाश्रमीचे नाव श्रीमती.प्रमिला शांताराम म्हात्रे
वय : ७६ वर्षे, व्यव : गृहिणी
वरील क्रं.१ ते ५ रा.मु.पो.जासई, ता.उरण, जि.रायगड
७) श्रीमती.जिजाबाई केशव कडू
पुर्वाश्रमीचे नाव श्रीमती.जिजाबाई शांताराम म्हात्रे
वय : ५४ वर्षे, व्यव : गृहिणी
रा.मु.वेश्वी, पो.दिघोडे, ता.उरण, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात अर्जदार क्रं.१, २, ४, ६ ते ७ यांचे वडील, अर्जदार क्रं.३/१ व ५/१ यांचे सासरे आणि अर्जदार क्रं.३/२ व ५/२ यांचे आजोबा कै.शांताराम सोमा म्हात्रे हे दि.०६/१०/२००७ रोजी मु.पो.जासई, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. कै.शांताराम सोमा म्हात्रे यांची पत्नी कै.मथुराबाई शांताराम म्हात्रे ह्या दि.२८/०८/१९९७ रोजी मु.पो.जासई, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. कै. शांताराम सोमा म्हात्रे हे मयत झाले आहेत. हे हयात अताना त्यांचे मृत्यूसमयी त्यांच्या नावे खालील वर्णनाची मिळकत होती व आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : जासई, ता.उरण, जि.रायगड**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| जासई १९/८८ | १५८ | ५ | ००-०७-७० |
| जासई २२९ | २७ | ४ | ००-२७-८० |

येणेप्रमाणे जमिन मिळकतीचे वर्णन असून सदरहू जमीन मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केल आहे.

येणेप्रमाणे वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदार हे तसेच कै.शांताराम सोमा म्हात्रे यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह ना.कोर्टात दाखल करावी. वरील मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन ना.कोर्ट अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२८ जून २०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **सही/-**
**क.लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, उरण** **दि.न्या.क.स्तर, उरण**

# संक्षिप्त...

## वीज चोरीचा गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अनधिकृतरीत्या डायरेक्ट केबल टाकून वीज चोरी केल्याप्रकरणी कोपरा येथील सुरेश शनिवार कोळी यांच्याविरुद्ध खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोपरा गाव, खारघर येथील सुरेश शनिवार कोळी हे राहत असलेल्या घराचा मीटर ९ जून २०२२ रोजी वीज देयक न भरल्यामुळे वीजमीटर कायमस्वरूपी खंडित करण्यात आला. मात्र ते राहत असलेल्या घरी विनापरवानगी अनधिकृतरित्या डायरेक्ट केबल टाकून वीज चोरी करत असल्याचे महावितरणला आढळून आले. त्यामुळे कंपनीचे एकूण २ हजार २१६ युनिटचे १३ हजार ७५० रुपयांचे आर्थिक नुकसान झाले.

## धोकादायक वृक्षाची छाटणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

प्र. क्र.१८मधील परदेशी आळी येथील रस्त्यालगत असलेल्या नारळाचे झाडावर महावितरणच्या अनेक केबल गेल्या असल्यामुळे पावसात वीजवाहीन्या एकमेकांच्या संपर्कात येऊन स्पर्किंग होत होत व झाडाला वीजेचा शॉक लागत होता. रस्ता रहदारीचा असल्यामुळे शाळेत जाणारी अनेक विद्यार्थी, महिला, नागरिकांची सतत वर्दळ असते. समोरच राहणाऱ्या सौ.मनीषा परदेशी यांच्या निर्दर्शनास येताच त्या स्वतः उभे राहून नागरिकांना, मुलांना सावधान करीत होत्या. शेकाप कार्यतत्पर नगरसेविका डॉ.सौ सुरेखा मोहोकर यांच्याकडे तक्रार येताच तातडीने पनवेल महानगर पालिका वृक्षप्राधीकरण विभाग यांच्याकडे हायड्रा शीडी उपलब्ध करून घेऊन आणि महावितरण विभागाचे चौधरी यांच्या सहकार्याने तातडीने वृक्ष छाटणी करून घेतली. भविष्यात होणारा धोका टळला याविषयी सर्व परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले.




### वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


# मुरूडमध्ये पाचव्या दिवशी पावसाचा जोर कायम

## अंबोली धरण ओसंडून वाहू लागले ; शासनाच्या निर्बंधांमुळे पर्यटक नाराज

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरूड तालुक्यात सलग पाचव्या दिवशीही पावसाचा जोर कायम आहे. या जोरदार पावसामुळे मुरुड खार अंबोली धरण ओसंडून वाहू लागला आहे. अंबोली डॅम ओहरफ्लो झाल्यामुळे पर्यटकांसाठी पर्वणी ठरणार आहे. पण पर्यटन स्थळांवर शासनाने लादलेल्या निर्बंधांमुळे पर्यटकांच्या आनंदवर विरजण पडले आहे. त्यामुळे पर्यटक व स्थानिक मोठ्या प्रमाणावर नाराजी व्यक्त करत आहेत.



रायगड जिल्ह्यातील मुरुड जंजीर येथील अंबोली डॅम लोणावळा येथील भुशी डॅम पेक्षा पर्यटकांना पोहण्यास सुरक्षित आहे. धरणाच्या ओहरफ्लो मार्गावर प्रशस्त स्विमींग टँकची बांधाणी करण्यात आलेली आहे. दरवर्षी पर्यटक पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात येत असतात.

दोन वर्षांच्या कोरोना कालखंडानंतर वर्षा पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी पर्यटक उत्साहात होते. परंतु शासनाने पर्यटन स्थळांवर निर्बंध लादल्यामुळे पर्यटकांच्या आनंदावर विरजण पडले आहे.

धरणाच्या ओहरफ्लो विभागात प्रशस्त जलतरण तलाव असल्यामुळे पोहताना धबधब्या खाली भिजण्याचा आनंद लुटताना येतो. या तलावाची खोली फक्त पाच फूट असल्याने कोणत्याही प्रकारचा धोका नाही. पावसाळ्यात वर्षासहळीचा आनंद घेण्यासाठी अनेक पर्यटक अशा ठिकाणी आर्वजून येत असतात.

हे ठिकाण मुंबई व पुण्यापासून १५० कि. मी. अंतरावर असल्याने एका दिवसात जावून येणे सोपे होते. गेल्या रविवारी दिवसभर मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक पासून संपुर्ण जिल्ह्यातील हजारो पर्ययटकांनी हजेरी लावली होती.

या ठिकाणाची सर्व स्थरातुन मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी होत असल्याने पर्यटक वर्षासहळीचा मनमुराद आनंद घेण्यासाठी मोठ्या संख्येने येत असतात. मुरुड पासून केवल ३ ते ४ व मुंबई, पुण्यापासून १५० किलोमीटर अंतरावर असल्याने अंबोली डॅमवर येण्यास मोठ्या प्रमाणात पसंती देत असतात.

# शेतकऱ्यांची भात शेतीकडे पाठ तर शेततळ्यांना पसंती

## पेण मधील साठ टक्के भातशेतीत मासेमारी सुरू

**दै.रायगड नगरी । पेण**

रायगड जिल्ह्यातील भाताचे कोठार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पेण तालुक्यातील अनेक शेतकरी भातशेती सोडून आता शेततळ्यांकडे वळाले आहेत. भातशेती करतांना उत्पन्ना-पेक्षा जास्त खर्च आणि मेहनत लागत असल्याने शेतकऱ्यांची आपोआपच पावले तळे खोदण्याकडे वळाली आहेत.



मागील अनेक वर्षे पिण्याच्या पाण्यापासून वंचित असलेला खारेपाट भाग जो शेती सोबत मासेमारी करणारा आहे. एकीकडे कोकणात शेतकऱ्यांचा जोड व्यवसाय जरी वेगवेगळा असला तरी त्यावेळी सत्तर टक्के शेती व्यवसाय करणारे शेतकरी आणि तीस टक्के मासेमारी करणारे आहेत. मात्र आता हे गणित बिघडले असुन सध्यस्थितीला जवळपास साठ टक्के शेतकरी मासेमारी व्यवसायाकडे वळू लागले आहेत. मागील काही वर्षांचा विचार केला तर सतत घडत असणारे वातावरणातील बदल आणि वर्षभरात कधीही येणारा पाऊस या बदलत्या ऋतुचक्रामुळे शेतकऱ्याचे अंदाज चुकत आहेत, परिणामी मेहनत करून केलेली भातशेती फुकट जात आहे. शेतीची मशागत, पेरणी, ला-वणी, कापणी, झोडणी करून शेतात पिकवलेले सोन्यासारखे भात घरामधे नेईपर्यंत यासाठी हजारों रुपये खर्च होत असून यासाठी मेहनत ही खूप करावी लागत आहे. मात्र शेतीसाठी जो खर्च होतो तो खर्च सुद्धा निघत नाही तर बऱ्याच वेळा कामासाठी कामगारही मिळत नाहीत. अनेकदा कामगारांसाठी भरमसाठ मजुरी भरावी लागते. या सर्व गोष्टींमुळे भातशेती करणारा शेतकरी या शेती व्यवसायाला कंटाळला असुन त्या ऐवजी आपल्याच शेतात शासनाच्या असणा-या विविध प्रकारच्या योजनांच्या माध्यमातून शेततळी खोदून लाखो रुपये उत्पन्न घेणे पसंत करत आहेत.

मागील तीन वर्षांत पेण तालुक्यात दरवर्षी दोनशे ते तीनशे हेक्टर शेती लागवडीचे प्रमाण कमी होत चालले आहे. यात तालुक्यातील अनेक शेतकरी शासनाच्या शेततळ्यांच्या योजनांचा फायदा घेऊन मत्स्यव्यवसाय करीत आहेत. त्यामुळे तालुक्यातील बरेच शेतकरी आता भातशेतीचा खर्च परवडणार न झाल्याने शेततळ्यांकडे वळाले आहेत.



शिवसेना नेते राजीव साबळे यांच्या वाढदिवशी माणगांव आणि तालुक्यातीलअनेक नेते व कार्यकर्ते यांनी त्यांची भेट घेवून त्यांना शुभेच्छा दिल्या. माणगावमधील हॅपी ग्रुपच्या पदाधिकारी विरेश येरूणकर, गंगाराम काते, राकेश सुपेकर, पदमाकर उभारे, संजय गमरे, अतुल चेरफळे, महादेव उभारे यांनी शुभेच्छा दिल्या.

# आपत्तीच्या मुकाबल्यासाठी पोलीस दलानेही दंड थोपटले

**दै.रायगड नगरी । महाड**

रायगडचे पोलीस अधिक्षक अशोक दुधे यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड पोलिसांचा स्वतंत्र आपत्ती व्यवस्थापन आणि नियंत्रण कक्ष कार्यरत करण्यात आला आहे.

नवीन पोलीस वसाहतीमधील कम्युनिटी हॉलमये हा नियंत्रण कक्ष कार्यरतकरण्यात आला असून, या ठिकाणी आपत्ती काळात मदत आणि बचावासाठी आवश्यकअसलेल्या सर्व प्रकारच्या साहित्याची आणि बचावाची सज्जता ठेवण्यात आली आहे. नियंत्रण कक्षात तीन टीम या नियंत्रण कक्षात तैनात करण्यात आल्या आहेत. प्रत्येक टिममध्ये ३ पोलीस अधिकारी, ८ पोलीस अंमलदार, ५ पोलस बोटमन आणि ५ पोलीस अंमलदार बोट चालविण्यासाठी राखीव आहेत. त्याचबरोबर एक पाच टनीवाहन, २ पीसीआर वाहन, ८ मोटार सायकल नियंत्रण कक्षात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. महाड उपविभागामध्ये १४ तर पोलादपूर विभागामध्ये पोलिसांची सात सेक्टर्स निर्माण करण्यात आ-लेली आहे. प्रत्येक सेक्टरमध्ये २४ तास दोन प्रशिक्षित पोलीस अंमलदार वॉकीटॉकसह सतर्क राहणार आहेत. प्रत्यक्ष मदत आणि बचावासाठी महाड शहरासह तालुकत १० टीम तैनात राहणार आहेत. प्रत्येक टीममध्ये २ पोलीस, महसूल आणि नगरपालिकेचे प्रत्येकी दोन कर्मचारी आणि रेस्क्यु टीमचे सदस्य नियुक्त करण्यात आले आहेत. रायगडचे पोलीस अधिक्षक अशोक दुधे, अप्पर पोलीस अधिक्षक अतुल झेंडे, महाडचे उपविभागीय पोलस अधिकारी निलेश तांबे यांनी भेट दिली. त्याचप्रमाणे या ठिकाणी तैनात अधिकारी, कर्मचार्यांची बैठक घेऊन त्यांना र्मादर्शन केले. आपत्ती व्यवस्थापनासाठी नेमण्यात आलेल्या अधिकारी आणि कर्मचार्यांना रेनकोट, गमबुट, रिंगबोया, लाईफ जॅकेट या साहित्याचे वाटपही करण्यात आले.

# ऑनलाइन कर्ज घेण्याच्या नादात ७५ हजार गमावले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ऑनलाईन कर्ज घेण्याच्या प्रयत्नात असलेल्या कळंबोलीतील एका विवाहितेला अज्ञात सायबर चोरट्याने ७५ हजार रुपयांना गंडा घातल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. कळंबोली पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात सायबर चोरट्या विरोधात फसवणुकीसह आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल केला आहे.

फसवणूक झालेल्या महिलेने ऑनलाईन कर्ज घेण्यासाठी मोबाईलवर एक ॲप डाऊनलोड केले होते. त्यावेळी सायबर चोरट्याने दीड लाख रुपये कर्जासाठी पात्र असल्याचा मेसेज पाठवल्याने तिने ॲपमध्ये सर्व माहिती भरून कस्टमर केअरवर क्लिक केले. त्यामुळे तिच्या मोबाइलवर सायबर चोरट्याचे व्हॉट्सॲप सुरू झाले. चोरट्याने विवाहितेसोबत चॅटिंग करून दीड लाख रुपयांच्या कर्जासाठी दहा टक्के सर्व्हिस चार्जेस रक्कम प्रथम भरावी लागेल, असे सांगून तिला एक लिंक पाठवून दिली. विवाहितेने लिंकच्या माध्यमातून गुगल पेवरून १५ हजार रुपये पाठवून दिल्यानंतर कर्ज मंजूर झाल्याचा व रक्कम काढून घेण्याचा मेसेज तिला मिळाला. तिने पैसे काढण्याचा प्रयत्न केला असता, सायबर चोरट्याने बँक खाते क्रमांक चुकीचा टाकल्याचे सांगून तो दुरुस्त करण्यासाठी दुसरा मोबाईल नंबर दिला. त्यानुसार विवाहितेने दुसऱ्या मोबाईलवर संपर्क साधला असता, सायबर चोरट्याने खाते क्रमांक दुरुस्त करण्यासाठी ३० हजार रुपये भरावे लागतील, असे सांगितले. विवाहितेने ही रक्कम फोन पे द्वारे भरल्यानंतर तिला कर्ज मंजूर झाल्याचा मसेज आला व ॲपवर जाऊन रक्कम ट्रान्स्फर करून घेण्यास सांगण्यात आले. विवाहितेने पवर पैसे ट्रान्स्फर करण्याचा प्रयत्न केला. मात्र पैसे ट्रान्स्फर न झाल्याने तिने चोरट्याला विचारणा केली असता, तिचे खाते बोगस असल्याचे सांगून कर्ज मंजुरीसाठी आणखी ४१,६६६ रुपये भरण्यास सांगण्यात आले. आपली फसवणूक होत असल्याचे लक्षात आल्यानंतर विवाहितेने प्रथम नवी मुंबई पोलिसांच्या सायबर सेलकडे व त्यानंतर कळंबोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# वृक्ष लागवड व संवर्धन काळाची गरज : अमित शेडगे

**दै.रायगड नगरी । दिघी**

कोकणच्या भूमीत विपुल वनसंपदा आहे. मात्र चक्रीवादळात श्रीवर्धन तालुक्यातील डेरेदार, उंच आणि पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाच्या असलेल्या जुन्या वृक्षांची अतोनात हानी झाली आहे. वृक्ष लागवड व संवर्धन ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन प्रांताधिकारी अमित शेडगे यांनी केले आहे.



वन महोत्सव कार्यक्रमांतर्गत निगडी गौळवाडी येथे वृक्षारोपणाचे आयोजन केले. वनक्षेत्रपाल मिलिंद राऊत वनरक्षक प्रशांत पाटील व तहसीलदार सचिन गोसावी यांच्या मार्गदर्शनानुसार वन खात्याच्या वतीने वृक्षारोपण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. वृक्षारोपण प्रसंगी प्रांताधिकारी अमित शेडगे यांनी वन कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. त्या संवादात अमित शेडगे म्हणाले आधुनिक पद्धतीने वृक्षाची लागवड केल्यास निश्चितच फायदा होतो.

श्रीवर्धन परिसरात पर्जन्यमान मोठया प्रमाणात आहे. भौगोलिक परिस्थिती, वातावरण व हवामान या सर्व बाबींचा विचार करून वन महोत्सवामध्ये वन विभागाच्या माध्यमातून चिंच, खैर, पळस, जाभूळ, काजू, आवळा, कांचन, आपटा विविध प्रजातीच्या झाडांची लागवड करण्यात येत आहे ही बाब निश्चितच पर्यावरण पूरक असून मानवाच्या दृष्टिकोनातून लाभदायक आहे.

मानवी आरोग्याच्या दृष्टिकोनातून वाढतं शहरीकरण धोकादायक ठरत आहे. आरोग्य विषयक बाबींसाठी विपुल प्रमाणात वृक्ष लागवड गरजेची आहे. श्रीवर्धनच्या आमदार अदिती तटकरे यांच्या हस्ते आज आपण तहसील कार्यालयाच्या प्रांगणामध्ये वृक्षारोपण केले. वन महोत्सव निश्चितच पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा ठरणार आहे. वनक्षेत्रपाल मिलिंद राऊत यांनी दिलेल्या माहितीनुसार आपल्या तालुक्यात पाच हेक्टर क्षेत्रावर जवळपास साडेपाच हजार वृक्षांची लागवड करण्याचा वन विभागाचा मनोदय आहे ही बाब निश्चितच कौतुकास्पद आहे. वन महोत्सवा व्यतिरिक्त वन विभागाने अशा स्वरूपाच्या वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करावे महसूल प्रशासनाच्या वतीने वन विभागास पूर्ण सहकार्य केले जाईल असे अमित शेडगे यांनी सांगितले.

# आपत्ती व्यवस्थापनामध्ये नागरिकांच्या सेवेसाठी अधिकारी एकवटले

**दै.रायगड नगरी । माथेरान**

रायगड जिल्ह्यातील एक दुर्गम पर्यटनस्थळ म्हणून जगप्रसिद्ध असलेल्या माथेरान मध्ये अंतर्गत प्रवासाची सुविधा उपलब्ध नसताना पावसाळ्यातील आपत्ती व्यवस्थापन मध्ये शासकीय अधिकारी वर्गाने नागरिकांच्या सेवेसाठी कंबर कसली असून सर्वच शासकीय अधिकारी संपूर्ण गावभर पायपीट करून फिल्डवर कार्यरत असल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.



वेधशाळेने सलग चार दिवस रायगड जिल्ह्यात अतिवृष्टीचा इशारा दिल्यामुळे वरिष्ठांच्या आदेशानुसार येथील नगरपरिषदेच्या प्रशासक तथा मुख्याधिकारी सुरेखा भणगे, पोलीस प्रशासनचे सहायक पोलीस निरीक्षक शेखर लव्हे, अधीक्षक दीक्षांत देशपांडे, वनखात्याचे आडे, जंगम, एमएसईबी चे अधिकारी, नगरपरिषदेचे कर्मचारी वर्ग गावातील विविध भागात जाऊन धोकादायक ठिकाणी वास्तव्य करीत असलेल्या कुटुंबांना सावधानता बाळगण्याची सूचना देत आहेत.

चोवीस तासात जवळपास १७५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली असून एकूण पर्जन्यमान १११८.७ मिलिमीटर इतकी झाली असल्याचे नगरपरिषदेचे आरोग्य विभागाचे अन्सार महापुळे यांनी सांगितले आहे.

एवढ्या मोठ्या प्रमाणावर पर्जन्यवृष्टी होत असताना देखील शासकीय यंत्रणा युद्धपातळीवर कामे करीत आहेत त्यातच नगरपरिषदेच्या महिला प्रशासक सुरेखा भणगे या मुख्यत्वे करून आपल्या कर्मचाऱ्यांमार्फत दवंडीच्या माध्यमातून जनतेला अतिवृष्टीत घराबाहेर पडू नये आपली व आपल्या कुटुंबाची काळजी घ्यावी,कामाशिवाय घराबाहेर जाऊ नये अशा सूचना दिल्या जात आहेत.कड्यालागत असणाऱ्या झोपडपट्टी भागाला देखील नोटिसा बजावून सुरक्षित ठिकाणी जाण्याची व्यवस्था सुध्दा सुरेखा भणगे यांनी नगरपरिषदेच्या माध्यमातून केली आहे. पर्यटकांना काही अडचणी निर्माण होऊ नयेत यासाठी सहायक पोलीस निरीक्षक शेखर लव्हे त्याचप्रमाणे वनखात्याचे अधिकारी सुध्दा कर्मचाऱ्यांमार्फत धोकादायक झाडांच्या फांद्या काढण्यात येत आहेत.ज्या ज्या ठिकाणी काही धोकादायक चित्र अथवा परिस्थिती निर्दर्शनास आल्यास सामाजिक कार्यकर्ते जनार्दन पार्टे, भास्कर शिंदे हे सोशल मीडियाच्या माध्यमातून अधिकाऱ्यांच्या निर्दर्शनास आणून देत आहेत त्यामुळे जलदगतीने कामे पूर्ण केली जात आहेत.

# महाराष्ट्र सरकारच्या बकरी ईद संदर्भातील मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे : रवींद्र दौंडकर



**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र सरकारच्या बकरी ईद संदर्भातील मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे असे आवाहन आज पनवेल तालुक्यातील बारापाडा तसेच वावंजे या ठिकाणी घेतलेल्या बैठकीमध्ये पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर यांनी केले.

बारापाडा व वावंजे येथे आगामी बकरी ईद उत्सवाच्या अनुषंगाने मस्जिद /मदरसा पदाधिकारी व सदस्य यांची एकत्रितपणे बैठक घेण्यात आली. या बैठकीत व.पो.नि. रवींद्र दौंडकर यांच्यासह तालुका पोलीस ठाण्याचे गोपनीय विभागाचे अंमलदार सचिन होळकर हे उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शनपर करताना व.पो. नि. रवींद्र दौंडकर यांनी सांगितले कि, कोरोना विषाणूचा संसर्ग अजून सर्वत्र पसरत असल्याने बकरी ईद हा पवित्र सण साजरा करताना मुस्लिम बांधवांनी नियमित नमाज पठण, धार्मिक विधी हे कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी , टेरेसवर साजरी करू नये, कोरोना विषाणूचा फैलावास प्रतिबंध करणाऱ्या उपायांचा जास्तीत जास्त अवलंब करणे बाबत नागरिकांना सांगणे, सार्वजनिक ठिकाणी कुर्बानी होणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच महाराष्ट्र सरकारच्या बकरी ईद संदर्भातील मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करण्यात येणे, बकरी ईद उत्सव सणाच्या अनुषंगाने संबंधितांनी महापालिका, स्थानिक प्रशासन यांची त्यांच्या धोरणानुसार यथोचित पूर्व परवानगी घेणे, आरोग्य विभागाकडून कोविड-१९ संसर्गजन्य परिस्थिती सर्वच ठिकाणी मोठ्या संख्येने वाढत असल्याने कोविड-१९ चा प्रादुर्भाव टाळण्यासाठी मोठ्या प्रमाणात एकत्र न येता साधेपणाने बकरी ईद उत्सव साजरी करणे अपेक्षित आहे याबाबत आपण आपल्या समाजात जनजागृती करावी इत्यादी महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या. या बैठकीला मशिद, मदरसा पदाधिकारी, सद्स्य आदी उपस्थित होते.